अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# मतांच्या टक्क्यापेक्षा संपत्ती वाढीच्या टक्क्यांचा विक्रम

या वेळेची लोकसभा निवडणूक नवा इतिहास निर्माण करणारी असल्यामुळे पुढचे काही दिवस देशभरात नवे सरकार नवे खासदार आणि त्याचा कारभार याविषयी चर्चा सुरू राहील. या लोकसभा निवडणुकीत अनेक प्रकारचे विक्रम झालेले आहेत, जे यापूर्वी कधीही नोंदले केले गेले नाहीत. जसे भारतीय जनता पार्टीला पूर्ण बहुमत मिळण्यापासून ते काँग्रेसला त्या पक्षाच्या राजकीय इतिहासातल्या सर्वांत कमी जागा मिळण्यापर्यंत एक विक्रमच नोंदला गेला. तसेच या निवडणुकीत ५४३ निवडून आलेल्या खासदारांपैकी ३१५ खासदार हे पहिल्यांदाच लोकसभेत जात आहेत हा देखील एक विक्रम आहे. याच्या बरोबरच या निवडणुकीतून असाही एक विक्रम नोंदला गेला की पुन्हा लोकसभेत निवडून आलेल्या खासदारांच्या संपत्तीमध्ये दुप्पटीपेक्षाही जास्त वाढ नोंदली गेली, म्हणजे नव्याने पुन्हा निवडून आलेल्या खासदारांच्या संपत्तीमध्ये सरासरी तब्बल साडेसात कोटींची वाढ झाली. म्हणजे प्रत्येक खासदाराने पाच वर्षांमध्ये सहजपणे सात कोटी रुपये कमविले. निवडणूक लढविताना आयोगाला जे प्रतिज्ञापत्र सादर केले जाते त्यात आपली संपत्ती किती आहे हे जाहीर करावे लागते. त्यामध्ये प्रत्यक्ष त्या खासदाराचे नावे किती संपत्ती आहे, याचाच उल्लेख केला जातो.

परंतु त्याच्या बायका मुलांच्या नावाने असलेल्या संपत्तीची मोजदाद होत नाही. विशेष म्हणजे ही संपत्ती दाखविताना अनेक प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्या केल्या जातात. कोणीही अगदी प्रामाणिकपणे आपल्या संपत्तीची माहिती देत नाही ही गोष्ट जर लक्षात घेतली तर प्रत्येक खासदारांच्या संपत्तीत दुप्पटच नव्हे तर नक्कीच पाच पट वाढ झालेली दिसून येईल. या निवडणुकीतून खासदारांच्या संपत्तीची जी आकडेवारी समोर आली त्यात सुध्दा वाढीचा एक वेगळा विक्रम नोंदला गेला, असेच म्हणावे लागेल. पराभवापासून ते विजयापर्यंत अनेक पक्षाच्या बाबतीत इतिहास घडला आणि अनेक खासदारांच्या संपत्तीत वाढ होण्याच्या बाबतीत या खासदारांनाही पाच वर्षांमध्ये कशी ऐतिहासिक कामगिरी केली हे यानिमित्ताने दिसून आले आहे.

### शत्रुघ्न सिन्हा, सुप्रिया सुळेंची आघाडी

एका स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब पुढे आली आहे. या खासदारांच्या संपत्ती वाढ झालेली पाहिल्यानंतर तुमच्या आमच्यासारख्या सामान्य माणसाला आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. मुळातच यातले लोकप्रतिनिधी किंवा राजकारणी हे श्रीमंत असतात त्यांच्याकडे गडगंज पैसा असतो. त्या पैशाच्या जोरावरच ते निवडणुकीचा खेळ खेळत असतात. आपल्याला समाजसेवा करायची आहे, देशसेवा करायची आहे असे सांगून ते निवडूनही येतात व प्रत्यक्षात त्यांची देशसेवा किती होते याचा काहीच पत्ता लागत नाही. परंतु पाच वर्षांत त्यांची लक्ष्मीसेवा व्यवस्थित होते. ज्या वेगाने त्यांची संपत्ती वाढते ते पाहिल्यावर यांच्याकडे पैसे कमविण्याची जादूची कांडी आहे की काय, असे सामान्य माणसाला सहजपणे वाटू शकते. राजकारणी लोक पैसे खातात, सरकार दरबारी अनेक उद्योगपतींची भांडवलदारांची कामे करून देण्यासाठी ते मोबदला घेतात. कमिशन किंवा टक्केवारी या गोष्टीतर राजकारणामध्ये सहजपणे बोलल्या जातात आणि केल्याही जातात. तरीसुध्दा त्यांच्या संपत्तीमध्ये पडणारी भर ही सामान्य माणसाचे डोळे दिपवणारी म्हणावी लागेल.

या स्वयंसेवी संस्थेने आपल्या अहवालात काही नावेही दिली आहेत आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे नरेंद्र मोदींच्याच पक्षाचे खासदार आणि एके काळचे अभिनेते शत्रुघ्न सिन्हा यांच्या संपत्तीमध्ये सर्वांत वाढ झाल्याचे नोंदले गेले. त्यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रामध्ये पाच वर्षांपूर्वी स्वत:ची संपत्ती १५ कोटी असल्याचे घोषित केले होते आणि २०१४ मध्ये त्यांची संपत्ती तब्बल ७७८ टक्क्यांनी वाढली आणि ती १५ कोटीवरून १३१ कोटीवर जाऊन पोहोचली. शत्रुघ्न सिन्हा यांनी पाच वर्षांत ११५ कोटी रुपये कमविण्याची जादू किंवा उच्चांक करून दाखविला आहे.

त्याच्या खालोखाल ओरिसातल्या बिजू जनता दलाचे खासदार पिनाकी मिश्रा यांचा नंबर लागतो. त्यांची २९ कोटींची संपत्ती पाच वर्षांत १३७ कोटी झाली म्हणजे ती ३६२ टक्क्यांनी वाढली. या सगळया संपत्तीच्या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र मागे राहणे शक्यच नव्हते. राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाच्या खासदार आणि शरद पवार यांच्या सुकन्या सुप्रिया सुळे यांची संपत्तीदेखील पाच वर्षांत १२१ टक्क्यांनी वाढली. पाच वर्षांत ती ५१ कोटींवरून १३१ कोटींवर जाऊन थांबली. वानगी दाखल दिलेल्या या तीन उदाहरणावरून पुन्हा निवडून आलेल्या खासदारांनी आपल्या मतांच्या टक्केवारीतल्या वाढीपेक्षा संपत्तीमध्ये जास्त टक्क्यांची वाढ घडवून आणली आहे.

### मोदींपुढे आव्हान

आज सगळया देशाने नरेंद्र मोदी यांना प्रामाणिक आणि भ्रष्टाचाराचे आरोप नसलेला स्वच्छ नेता म्हणून निवडून दिले पण त्यांच्याही पक्षाच्या खासदाराच्या संपत्तीत अशी विक्रमी वाढ होत असेल तर सरकार आणि राजकारणातला भ्रष्टाचार ते कसा रोखू शकतील असा प्रश्न निर्माण होतो. सामान्य माणसाला दर वर्षांला आपल्या उत्पन्नात हजार दोन हजार रुपयांची सुध्दा वाढ करता येत नाही तिथे लोकप्रतिनिधी किंवा राजकारण्यांच्या संपत्तीत १००पटीने वाढ होते, यावरून आपल्या देशात गरीब आणि श्रीमंतीमध्ये केवढी मोठी दरी आहे आपोआप स्पष्ट होते. या निवडणुकीच्या निमित्ताने जो काय प्रचार झाला त्यात परदेशात असलेला काळा पैसा भारतात आणला जाईल असे आश्वासन दिले गेले.

परंतु भारतातच तितक्या वेगाने संपत्ती वाढते म्हणजेच त्याच वेगाने काळा पैसाही वाढतो आहे तो कसा रोखणार असा प्रश्न निर्माण होतो. मोदी स्वत:ही कितीही चांगले असले तरी त्यांना त्यांचे सरकार लोकप्रिय आणि यशस्वी करायचे असेल तर निदान त्यांच्या पक्षातील खासदारांवर अंकुश ठेवावा लागेल. यामध्ये ते किती यशस्वी होतील याबद्दल मात्र आम्हाला शंका वाटते. या निवडणुकीने अनेक प्रकारचे ऐतिहासिक विक्रम केलेले आहेत ते कायम राहिले तरी चालतील. परंतु खासदारांच्या संपत्तीतल्या वाढीचा विक्रम मोडून काढण्याचे काम मोदी यांनी करून दाखवावे.